# जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग अहमदनगर

## यशोगाथा

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभागाकडे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत डोंगरी विकास योजना, आदिवासी अंगणवाडी बांधकामे, अंगणवाडी बांधकामे, किमान गरजा कार्यक्रम, क वर्ग तिर्थक्षेत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामे, आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापना, प्राथमिक शाळा खोली बांधकामे, प्राथमिक शाळा इमारत विशेष दुरुस्ती, जि.वा.यो. ३०५४, जि.वा.यो. ५०५४, श्री. शिर्डी संस्थान अंतर्गत शाळा खोली बांधकाम करणे, चिन्हांकित निधी अंगणवाडी इमारत बांधकाम करणे, आदिवासी उप योजना रस्ते व मो-या इत्यादी योजनेअंतर्गत कामे या विभागामार्फत केले जातात.

**<u>विविध विकास कामे-</u>**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण करणे (३०५४) या योजनेमध्ये २९१९.०२ लक्ष अनुदान प्राप्त असून १६६ कामे मंजूर होती. सदर १६६ कामांवर १०००.४४ लक्ष इतका खर्च झालेला आहे. तसेच ग्रामीण रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण करणे (५०५४) या योजनेमध्ये ७६७.३१ लक्ष अनुदान प्राप्त असून २७ कामे मंजूर होती. सदर २७ कामांवर ५४७.८२ लक्ष इतका खर्च झालेला आहे. जिल्हा वार्षिक योजना लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत जिल्हयात अंदाजे ३८.७० किमी लांबीच्या रस्त्यांचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आलेले आहे. सदरच्या रस्त्यांमूळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेला तसेच शेतक-यांना दळणवळण सोपे झालेले आहे.

जिल्हा वार्षिक योजना ३०५४ अंतर्गत कोपरगाव तालुक्यातील रामा ७ ते माहेगाव देशमुख मार्ग (जोर्वेकर वस्ती) सी.डी.वर्क करणे. ग्रामा ३० ता.कोपरगाव रक्कम ५०.०० लक्ष रक्कमेचे काम पुर्ण झालेले आहे. सदर पुलाची लांबी ७.५८ मीटर, रूंदी ८ मीटर व उंची ७ मीटर करण्यात आलेली आहे. सदरचे पुलामुळे ग्रामस्थांना फायदा झालेला असून माहेगाव देशमुख (जोर्वेकर वस्ती) रामा ७ या रस्त्याला जोडले गेलेले आहे.





जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत प्राथमिक शाळा खोल्या इमारत बांधकाम करणे व दुरुस्ती करणे या योजनेमध्ये १६०३.५९ लक्ष अनुदान प्राप्त असून २४६ कामे मंजूर होती. सदर २४६ कामांवर ३०७.९७ लक्ष इतका खर्च झालेला आहे. अंगणवाडी बांधकामे/दुरुस्ती या योजनेमध्ये ६९८.७६ लक्ष अनुदान प्राप्त असून ३८ कामे मंजूर असून १७६.८२ लक्ष निधी खर्च झालेला आहे. सदर योजनेतील कामांमुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांना शिक्षणासाठी प्रशस्त शाळा खोल्या तसेच पूर्व प्राथमिक मुलांसाठी अंगणवाडया उपलब्ध झालेल्या आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत मौजे माहेगाव देशमुख ता.कोपरगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत रक्कम रु.५००.००लक्ष बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच सदर इमारतीस चारही बाजुंनी संरक्षक भिंत बांधलेले असुन विदयतीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर इमारतीचे एकुण बांधकाम क्षेत्रफळ ११०००.०० चौ.फुट असुन इमारती मध्ये ऑफीस,मेडीकल,प्रयोगशाळा,मिटींग हॉल,शौचालय गृह,ड्रेसिंग रुम,स्त्री व पुरुष वॉर्ड, शस्त्रक्रिया गृह इ.सुविधा देण्यात आलेले आहे.







मौजे कुकाणा ता.नेवासा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत रक्कम रु.३४६.०० लक्ष बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच सदर इमारतीस विदयुतीकरण करणे रक्कम रु.१४.०० लक्षचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.सदर इमारतीचे एकुण बांधकाम क्षेत्रफळ ९०५६.०० चौ.फुट असुन इमारती मध्ये ऑफीस,मेडीकल,प्रयोगशाळा,मिटींग हॉल,शौचालय गृह,ड्रेसिंग रुम,स्त्री व पुरुष वॉर्ड, शस्त्रक्रिया गृह इ.सुविधा देण्यात आलेले आहे.





आदिवासी क्षेत्रामध्ये या विभागांतर्गत अकोले हा तालुका येत असून सदर आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी पूढील योजनांमधून निधी खर्च करण्यात येतो. सदरच्या योजनामुळे आदिवासी क्षेत्रातील व डोंगरी क्षेत्रातील दळणवळण करणे सोईचे व सोपे झालेले आहे. तसेच सदर क्षेत्रातील मुलांसाठी शाळा खोल्या व अंगणवाडया उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. आदिवासी अंगणवाडी बांधकामे या योजनेमध्ये ४९.२० लक्ष अनुदान प्राप्त असून ४ कामे मंजूर असून सदरची कामे प्रगतीत आहेत. किमान गरजा कार्यक्रम या योजनेमध्ये ३६७.४४ लक्ष अनुदान प्राप्त असून १९ कामे मंजूर असून ९४.०३ लक्ष निधी खर्च झालेला

आहे. डोंगरी विकास कार्यक्रम या योजनेमध्ये १०३.९६ लक्ष अनुदान प्राप्त असून ५३ कामे मंजूर असून प्रगतीत आहेत.

आदिवासी उपयोजना अंतर्गत मौजे पाचपट्टा ता.अकोले येथे उपकेंद्र मुख्य इमारत रक्कम रु.९१.०० लक्ष बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे.




**<u>बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावरील प्रकल्प-</u>**

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभागांतर्गत बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद मालकीच्या मोकळया जागा विकसित करणे बाबत प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांची सदयस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | सर्व्हे नंबर | प्रकल्पाची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प.प्राथमिक शाळा गोदावरी वसाहत ता. राहाता जि.अहमदनगर | सर्व्हे न. २८१/अ | ७१६.१७ लक्ष | सदर तीन कामांच्या सुसाध्यता अहवालास मुख्य अभियंता प्र.ग्रा.स.यो. पुणे यांचेकडून सुसाध्यता अहवालास मंजूरी प्राप्त असून मा. सचिव मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ग्रामविकास |
| २ | जि.प.प्राथमिक शाळा येसगाव ता. कोपरगाव जि.अहमदनगर | सर्व्हे नं. ९६/५ | ७९७.३५ लक्ष | |
| ३ | कोपरगाव येथील जि.प.मालकीची जागा ता. कोपरगाव जि.अहमदनगर | सर्व्हे नंबर ७ (सिटीएस नं. १९३७, २००६,२००८,२०१०,२० | ४३९९.४० लक्ष | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १२,६७६,६७७/३), सर्व्हे न. १/६ | | विभाग मुंबई यांचेकडे प्राथमिक मंजूरीस्त सादर करण्यात आलेला आहे. |

सदयस्थितीमध्ये सदर प्रकल्पांचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता व डि.टी.पी. मंजूरी मिळणेसाठी मा.अधिक्षक अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेले आहेत.

मौजे लोणी खुर्द ता.राहाता येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बी ओ टी तत्वावर विकसित करणे या प्रकल्पातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारत बांधकाम पुर्ण करून हस्तांतरित करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकल्पातील व्यापारी गाळयांचे बांधकाम पुर्ण झालेले असून हस्तांतरीत करणेत आलेले आहेत.





तसेच मौजे कोल्हार भगवती ता.राहाता येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बी ओ टी तत्वावर विकसित करणे या प्रकल्पातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारत बांधकाम पुर्ण करून हस्तांतरित करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकल्पातील व्यापारी गाळयांचे बांधकाम पूर्ण करून हस्तांतरीत करणेत आलेले आहेत.





मौजे सात्रळ ता.राहुरी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बी ओ टी तत्वावर विकसित करणे या प्रकल्पातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारत बांधकाम पुर्ण करून हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पातील व्यापारी गाळयांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे.





## कार्य निरीक्षण प्रणालीची (Work Management System)-

जिल्हा परिषद अहमदनगर येथील मा. प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या संकल्पनेने कार्य निरीक्षण प्रणाली हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अहमदनगर अंतर्गत  येणा-या जि.प.सा.बांधकाम उत्तर विभाग, जि.प.सा.बांधकाम दक्षिण विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग, ग्रामपंचायत विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग इत्यादी या विभागांतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांच्या ट्रॅकिंगसाठी १ वर्ष देखभाल दुरुस्तीसह कार्य निरीक्षण प्रणालीची (Work Management System) निर्मिती करण्यात आलेली आहे.

या सॉफ्टवेअर द्वारे जिल्हा परिषदे मधील संपूर्ण कामांचे परिपूर्ण ट्रॅकिंग करता येईल. काम सुरू होण्यापासून अंतिम टप्प्यापर्यंत म्हणजेच कार्य समाप्ती पर्यंत सर्व कागदपत्रे अर्थातच प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यतेबद्दल माहिती, निवीदा , निवीदा प्रसिद्धची माहिती व कार्यारंभ आदेश या सर्व गोष्टी अपलोड करता येतील.

कार्यनिरीक्षण प्रणालीमध्ये कामांचे ट्रॅकिंग करणे करीता पोर्टल विकसीत करणे, ॲप विकसीत करणे, दैनंदिन बॅकअप ठेवणे, १ वर्षासाठी १५० जिबी पर्यंत साठवण क्षमता ठेवणे व सदर प्रणालीची देखभाल दुरुस्ती करणे इ. बाबी अंतर्भुत आहेत.

सदर कार्यनिरीक्षण प्रणाली तयार करुन सदरची प्रणाली कार्यान्वयीन झाल्यास विविध आढावा बैठकांसाठी आवश्यक असणारी माहिती तात्काळ तयार करणे शक्य होणार आहे. सर्व कागदपत्रे अपलोड झाल्यानंतर ते काम टप्पे निहाय पूर्ण करून अपडेट करणे शक्य होणार असल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता व विभाग प्रमुखांना प्रत्येक कामाची सदयस्थितीची माहिती एका क्लिकवर शक्य होणार आहे. जिल्हा परिषदे अंतर्गत राबवल्या जाणा-यो सर्व कामांच्या प्रत्यक्ष भेटींचे फोटो तसेच बिलांचे संदर्भ अपलोड करता येणार आहेत. सॉफ्टवेअर मध्ये सर्व कामांच्या माहितीच्या आधारावर वेगवेगळे सांख्यिकी व ग्राफिकल अहवाल उपलब्ध असतील.

सदर प्रणालीमध्ये मुख्यालय स्तर व क्षेत्रिय स्तर अशा दोन स्तरावरुन माहिती संकलित केली जाणार आहे. सदर प्रणालीमध्ये काम तयार करणे, प्रशासकिय मान्यता आदेश , तांत्रिक मान्यता आदेश, निविदा स्तर, कार्यारंभ आदेश, प्राप्त अनुदान, काम पुर्णत्वाचा दाखला तसेच झालेल्या खर्चाची माहिती मुख्यालय स्तरावरुन संकलीत केली जाईल. तसेच कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा तयार करणे, सुरु असलेल्या कामांचे फोटो, पूर्ण झालेल्या कामांचे देयक इ. बाबींची माहिती क्षेत्रिय स्तरावरुन संकलीत केली जाणार आहे.

जिल्हा परिषदेसोबतच तालुक्यातील गट विकास अधीकारी, उप अभियंता यांना देखील तालुक्यात चालू असलेले काम व त्यांची सदयस्थिती क्लिक वर उपलब्ध असणार आहे. कामातील टप्प्यांना विलंब झाल्यास संबधित अधिकारी व कर्मचार्यां ना सॉफ्टवेअर द्वारे आपोआप स्मरण करून दिले जाणार आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या जिल्हाभरातील कामांचा व्याप पाहता अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे प्रत्येक कामांचे परिपूर्ण ट्रॅकिंग करणे क्रमप्राप्त झाले आहे.